# रुपाली चाकणकर यांची हकालपट्टी करा!

## महाविकास आघाडीची राज्यपालांकडे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही वर्षांपासून महिला अत्याचारांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. यात अल्पवयीन बालिकांवरील लैंगिक अत्याचार, महिलांचे बेपत्ता होणे, कौटुंबिक छळ, हिंसाचार तसेच हुंडाबळीचा समावेश आहे. महिलांवरील या अमानुष अत्याचारांना वाचा फोडण्यासाठी राज्य महिला आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोग सारख्या संस्था कार्यरत आहेत. तथापि अत्याचारग्रस्त महिलांनी केलेल्या तक्रारींबाबत राज्य महिला आयोगाची भूमिका असंवेदनशील, बेजबाबदार आणि पक्षपाती स्वरूपाची असल्याची टीका करत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची पदावरून हकालपट्टी करावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या महिलानेत्यांनी मंगळवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना भेटून केली.



पुण्यातील वैष्णवी हगवणे या विवाहित तरुणीने सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली. वैष्णवीचे सासरे राजेंद्र हगवणे हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित होते. हगवणे कुटुंबातील वैष्णवीची मोठी जाऊ मयुरीला देखील कौटुंबिक हिंसा-चाराचा सामना करावा लागला होता. तिने या प्रकरणी पोलीस ठाण्यात तसेच महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली असतानाही तिच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा ज्या पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष आहेत त्याच पक्षाचे हगवणे हे पदाधिकारी आहेत. त्यामुळे मयुरीच्या तक्रारीची दखल न घेण्यामागे राजकीय हस्तक्षेप असल्याचा आरोप होत आहे.

### मागण्यांचे निवेदन सादर

या पार्श्वभूमीवर सुषमा अंधारे, रोहिणी खडसे, विद्या चव्हाण, किशोरी पेडणेकर, जयश्री शेळके, डॉ.ज्योती गायकवाड आदींनी आज राजभवनावर जाऊन राज्यपालांची भेट घेऊन त्यांना मागणीचे निवेदन दिले. राज्य महिला आयोग हा महिलांना न्याय मिळवून देणारा एक अत्यंत महत्त्वाचा आणि निष्पक्ष असा संस्थात्मक मंच असावा, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. परंतु, सध्या आयोगाच्या अध्यक्षपदी एका राजकीय पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपद भूषवणाऱ्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली आहे. ही व्यक्ती पक्षाच्या ध्येयधोरणांच्या प्रसार आणि अंमलबजावणीमध्ये पूर्णवेळ व्यस्त असून उरलेल्या वेळेत आयोगाचे कामकाज पार पाडते, असे निवेदनात म्हटले आहे.

# स्वप्नांचे घर शोधण्यात मदत हे खरे सेवा क्षेत्र : जितूभाई ठक्कर

## प्राण असोसिएशनचा 'पॉवर टॉक'मध्ये संवाद

**नाशिक ।** व्यावसायिक आयुष्यात विविध सेवा क्षेत्र अस्तित्वात आहेत. मात्र, नागरिकांचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांची मदत करणे हे खरे सेवा क्षेत्र असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक जितूभाई ठक्कर यांनी केले.

प्राण असोसिएशन आयोजित व प्राण नॉलेज फोरम अंतर्गत रिअल इस्टेट उद्योगातील दिग्गजांशी पॉवर टॉक या उपक्रमाप्रसंगी ते बोलत होते. नुकत्याच कॉलेजरोड येथील गुरुदक्षिणा सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मुंबई येथील नेक्स्टजन डेव्हलपर चिंतन वासानी, प्राण असोसिएशनचे अध्यक्ष राज तलरेजा, सचिव नितीन कोतकर, प्राण नॉलेज फोरम हेडचे प्रशांत नहार आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



जितूभाई ठक्कर यांनी प्राण संघटनेच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी नरेडकोचे अध्यक्ष सुनील गवादे, सुजॉय गुप्ता, वासुदेव ललवाणी, शंतनु देशपांडे, प्रकाश चौधरी, भावेश ठक्कर, शीतल शहा, संजय मोरे, दिलीप पंजवानी, विशाल कोठावदे, संजय दुसे यांची विशेष उपस्थिती होती.

चिंतन वासानी म्हणाले, सध्या डिजिटलचा जमाना असून, सदनिकांचा व्यवहार करताना डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. तसेच कुठल्याही शहरात बांधकाम क्षेत्राचा विकास साधायचा असेल तर त्या शहराचे ब्रँडिंग होणे आवश्यक असते. अध्यक्ष राज तलरेजा यांनी या उपक्रम आयोजनामागील भूमिका विशद केली. जग बदलत असून, त्या अनुषंगाने व्यवसायातही बदल करणे गरजेचे आहे. ही माहिती सदस्यांना मिळावी, असा उपक्रमाच्या आयोजनामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी प्राण असोसिएशनचे आयपीपी विक्रांत आव्हाड, उपाध्यक्ष प्रदीप रणधीर, सहसचिव गिरीश विजन, खजिनदार नितीन जांगडा, सहखजिनदार अमित वाघ, सल्लागार राजेंद्र कोतकर, डी. जे.धामणे आणि कैलास कदम, तसेच समिती सदस्य संजय दुसे, पवन राठी, योगेश नेरकर, यश शहा,क्षितिज दंडगव्हाळ, मनीष शाह, नीलेश येवले, रवी सूर्यवंशी, जगदीश बंग ,बादल आग्रवाल, श्रीकांत पाटेकर व प्रियंका तलरेजा उपस्थित होते.

पान १ वरून ....

## भारताचा जबर आघात

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून केलेली कारवाई ही आधी वर्तवण्यात येत असलेल्या अंदाजांपेक्षा अधिक व्यापक आणि तीव्र असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच या माहितीमुळे पाकिस्तानकडून भारताला झालेल्या मोठ्या प्रमाणावरील नुकसानीबाबत करण्यात येत असलेला दावाही खोटा असल्याचे उघड झाले आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून भारताने ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूरअंतर्गत प्रत्युत्तरदाखल कारवाई केली होती. तेव्हा भारतीय सैन्यदलांकडून बहावलपूर येथील जैश ए मोहम्मदचा अड्डा, मुरिदके येथील लष्कर ए तोयबा याचे प्रशिक्षण केंद्र यांना प्रामुख्याने लक्ष्य करण्यात आल्याचे सांगण्यात आले होते.

## ४८ तासांची लढाई आठ तासांत फत्ते

दाखवते की, युद्ध केवळ स्ट्राइक नाही, तर राजकारणाचा सुद्धा भाग आहे. सीडीएस चौहान यांच्यानुसार, ऑपरेशन सिंदूरमध्ये युद्ध आणि राजकारण एकत्र सुरु होते. आमच्याकडे चांगली काऊं टर ड्रोन सिस्टिम होती, त्याचा फायदा झाला. १० मे च्या रात्री १ वाजताच पाकिस्तान युद्ध हरला होता. ४८ तासाची लढाई आम्ही ८ तासांतच संपवली होती. त्यांनी फोन उचलला व चर्चा करण्यास तयार झाले. आम्ही प्रोफेशनल फोर्सेस आहोत. आमच्यावर नुकसान आणि झटक्यांचा परिणाम होत नाही. चुका समजून सुधारल्या पाहिजेत. मागे फिरु नये. युद्धामध्ये नुकसानीपेक्षा रिझल्ट जास्त महत्त्वाचा असतो. ऑपरेशन सिंदूर एका अशा युद्धनितीच उदहारण होते, असे चौहान म्हणाले.

## विराट विजयोत्सव

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने अंतिम फेरीत प्रथम फलंदाजी करताना ९ गडी गमावताना १९० धावा केल्या. आरसीबीची सुरुवात फलंदाजीला चांगली झाली नव्हती. आरसीबीने पॉवरप्लेमध्येच फिल सॉल्टची विकेट गमावली. पॉवरप्लेमध्ये १ बाद ५५ धावा केल्या आहेत. विराट कोहलीने ३५ चेंडूत ३ चौकारांसह ४३ धावांची खेळी केली. तर मयंक अग्रवाल २४ धावा, रजत पाटीदार २६ धावा, लिव्हिंगस्टोन २५ धावा, जितेश शर्माने १० चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह २४ धावांची खेळी केली. यासह आरसीबीने २० षटकांत १९० धावा केल्या आहेत.

# 'एचसीजी मानवता'चे वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात दमदार पाऊल

**नाशिक ।** 'एचसीजी मानवता' कॅन्सर सेंटरने वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात दमदार पाऊल टाकताना, तीन नवीन शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी मान्यता प्राप्त केली आहे. राष्ट्रीय परीक्षा मंडळा (एनबीई) कडून डी. एन.बी. मेडिकल आँकोलॉजी आणि एफ. एन.बी. आँको-ॲनेस्थेसिया तर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून बी.एस्सी. नर्सिंग सुरू करण्यासाठी मान्यता दिल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक व चीफ ऑफ सर्जिकल ऑन्कॉलॉजी ॲण्ड रोबोटिक सर्व्हिसेस प्रा. डॉ. राज नगरकर यांनी दिली.

एफ.एन.बी. आँको - ॲनेस्थेसिया अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळवणारे 'एचसीजी मानवता' कॅन्सर सेंटर हे टाटा मेमोरियल हॉस्पिटलनंतरचे महाराष्ट्रातील दुसरे हॉस्पिटल ठरले आहे. यामुळे उत्तर महाराष्ट्रात पहिल्यांदाच हा अभ्यासक्रम उपलब्ध होणार आहे. या अभ्यासक्रमांमुळे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि रेसिडेंट डॉक्टरांना कर्करोगाच्या क्षेत्रात अत्याधुनिक प्रशिक्षण घेण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. कॅन्सर केअरमध्ये अग्रगण्य असलेल्या एचसीजी मानवता हॉस्पिटलने आता शिक्षण क्षेत्रातही कामगिरीची छाप सोडली आहे. मिळालेली मान्यता केवळ संस्थेपुरता मर्यादित नसून, नाशिकसारख्या वाढत्या वैद्यकीय गरजा असलेल्या शहरासाठी मोठे पाऊल आहे. आमचे ध्येय केवळ दर्जेदार उपचार देण्यापुरते मर्यादित नाही. वैद्यकीय शिक्षणातही उत्कृष्टता साधण्याचे आमचे ध्येय असल्याचे डॉ. राज नगरकर यांनी सांगितले.

# महाराष्ट्र अंनिसची राज्य कार्यकारिणी घोषित

## नाशिकच्या पाच जणांची फेरनिवड

**नाशिक ।** महाराष्ट्र अंनिसच्या शाखा, जिल्हा व राज्यपातळीवरील पदाधिकाऱ्यांची विस्तारित राज्य कार्यकारिणीत पुढील तीन वर्षांसाठी नाशिकच्या पाच जणांची फेरनिवड झाली.

संघटनेच्या राज्य अध्यक्ष म्हणून लातूरचे माधव बावगे तर राज्य कार्याध्यक्ष म्हणून इस्लामपूरचे (सांगली) संजय बनसोडे यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली. नाशिक येथील डॉ. ठकसेन गोराणे यांची राज्य प्रधान सचिव म्हणून तर कृष्णा चांदगुडे यांची जातपंचायतीला मूठमाती अभियानाचे राज्य कार्यवाह व प्रा.डॉ. सुदेश घोडेराव यांची राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समन्वय विभागाचे राज्य कार्यवाह म्हणून फेरनिवड झाली. महाराष्ट्र अंनिसचे मुखपत्र असलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या संपादक मंडळाचे सदस्य म्हणून प्रल्हाद मिस्त्री व राजेंद्र फेगडे यांची फेरनिवड झाली.



यावेळी अंनिसच्या वतीने नाशिक शहर शाखा व नाशिकरोड शाखा यांना लक्ष्यवेधी शाखा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# एचएएलच्या 'तेजस'चे हवाई दलाला बळ

नवी उंची प्रदान करेल.त्यासोबतच नाशिकच्या लौकिकात भर घालणार आहे. स्वदेशी निर्मितीकडे आत्मनिर्भरतेचे मोठे पाऊल सध्या नाशिकमध्ये 'तेजस एमके-१ ए' चे पहिले विमान अंतिम उत्पादनाच्या टप्प्यात आहे. डिलिव्हरीनंतर त्याची कार्यक्षमता तपासण्यासाठी भारतीय हवाई दलात प्रत्यक्ष चाचण्या घेतल्या जातील. चाचण्या यशस्वी झाल्यास भारताचे स्वदेशी लढाऊ विमान निर्मितीकडे आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक मोठे पाऊल पडेल.यात नाशिकचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे.

### 'तेजस एमके-१ ए' आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रतीक

मिग-२१ सारख्या जुन्या लढाऊ विमानांच्या जागी 'तेजस एमके-१ ए' भारतीय हवाई दलात समाविष्ट होणार आहे. या प्रगत विमानामध्ये ईएल/एम-२०५२ एईएसए रडार, इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर सूट, आणि स्वदेशी डेटा लिंक यांसारखी अत्याधुनिक उपकरणे बसवण्यात आली आहेत. हे लढाऊ विमान सुमारे ६५ टक्के स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असून, भारताच्या संरक्षण स्वावलंबनाचा तो एक ठळक प्रतीक आहे.

### घटक पुरवठा आणि विलंबाचे आव्हान

मेम २०२५ मध्ये व्हिइएम टेक्नॉलॉजीज या भागीदार कंपनीने पहिला सेंटर फ्यूजलेज एचएएलला सुपूर्द केला. मात्र,जीई एव्हिएशन (अमेरिका) कडून इंजिन पुरवठ्यात झालेल्या विलंबामुळे प्रकल्पाचे वेळापत्रक एक वर्षाहून अधिक मागे पडले. त्यामुळे हवाई दलाच्या वाढत्या गरजांना प्रतिसाद देण्यासाठी उत्पादनाचा वेग वाढवणे हे आता एचएएलसमोरचे एक महत्त्वाचे आव्हान आहे.

### स्थानिक आणि राष्ट्रीय अभिमानाचा क्षण

नाशिकमधून उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पामुळे स्थानिक रोजगार, तांत्रिक कौशल्य विकास आणि जागतिक संरक्षण उत्पादन क्षेत्रातील नाशिकचा ठसा अधिक गडद होईल. तेजस एमके-१ ए हे केवळ एक लढाऊ विमान नसून, 'मेक इन इंडिया' च्या यशाचे उड्डाण आहे.

# विरोध झुगारून गोदावरीत यांत्रिकी गेटचा रेटा

करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. यांत्रिकी गेटची गुणवत्ता, सुरक्षितता आणि वेळेत केलेली कामे यावरच नाशिककरांचा विश्वास आणि गोदावरीच्या भविष्यातील स्थिती अवलंबून राहणार आहे. सध्या जून महिना सुरू असून, यंदाचा पावसाळा वेळेत सुरू होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अशा परिस्थितीत यांत्रिकी गेटचे ट्रायल काम पूर काळात होणार असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. गेटचे काम पूर्ण न झाल्याने, त्याचा प्रत्यक्ष प्रयोग म्हणजेच ट्रायल आता पावसाळ्यात होईल काय? त्यामुळे पाण्याचा जोर वाढल्यास गेट आणि त्यासंदर्भातील संरचना वाहून जाण्याचा धोका नागरिकांनी व्यक्त केला आहे. पावसाळ्यापूर्वी गेट पूर्ण करून त्याची चाचणी घेणे अधिक सुरक्षित ठरले असते, असेही गोदाप्रेमींचे म्हणणे आहे

### यांत्रिकी गेट म्हणजे काय?

स्मार्ट सिटीच्या माहितीनुसार,हवेच्या फुग्यांच्या माध्यमातून गेटची उघडझाप केली जाणार आहे. अमेरिकन तंत्रज्ञान यात वापरण्यात आलेले आहे.या यांत्रिकी गेटमुळे पाण्याचा प्रवाह जमिनीपासून सलग वाहता ठेवता येणार आहे.त्यामुळे बंधाऱ्यात गाळ साचण्याचा प्रश्न निकाली निघणार आहे. सध्या होळकर पुलाखाली बंधारा आहे आणि पाण्याचा प्रवाह गतिमान झाल्यास त्या ठिकाणी बंधाऱ्यावरुन पाणी आदळण्यामुळे गोदावरी अधिक रौद्र रूप धारण करते. त्यावर उपाय म्हणून बलून तंत्रज्ञानावर आधारित हे गेट उभारले जात आहेत. गरज भासल्यास या गेटला भुईसपाट करण्याचीही सुविधा असल्यामुळे पाणी संथ गतीने वाहू शकते, असा दावा स्मार्ट सिटीकडून करण्यात येत आहे.

### न्यायालयीन प्रक्रियेचा फटका की दुर्लक्ष?

या प्रकल्पाला गोदा प्रेमींकडून न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. नदीपात्रातील अतिक्रमण व पर्यावरणाच्या दृष्टीने हे गेट योग्य नसल्याचा युक्तिवाद होता. न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. मात्र या कामाला स्थगिती दिलेली नसल्याने स्मार्ट सिटीने काम सुरुच ठेवल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.प्रत्यक्षात न्यायालयीन प्रक्रियेत अडथळा नसताना देखील यांत्रिकी गेटची उभारणी प्रलंबित आहे. ३१ मीटरपर्यंत गेटचे काम पूर्ण करण्याचे ठरले होते आणि स्मार्ट सिटी योजनेची मुदत त्याच काळात संपुष्टात आल्याने हे काम वेळेवर पूर्ण झालेले नाही. यावर ठेकेदारांकडून विलंब कां झाला?, याची चौकशी कोणीच करत नसल्याचे दिसून येते.

# अनास्कर एनडीसीसीचे संस्थात्मक सल्लागार

शिक्कामोर्तब झाले होते. राज्य सहकारी बँक ही त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेत 'शिखर' संस्था म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे, राज्य बँक आणि विविध कार्यकारी संस्था यांच्यातील दुवा असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सक्षम करणे हे राज्य बँकेचे नैतिक कर्तव्य आहे. यापूर्वी १२ मार्च २०२५ रोजीच्या आदेशानुसार, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवरही राज्य सहकारी बँकेची 'संस्थात्मक प्रशासक' म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, तिच्या सक्षमीकरणाचे काम सुरू झाले आहे. याच धर्तीवर आता नाशिक जिल्हा बँकेलाही मदतीचा हात देण्यात आला आहे.

### जिल्हा बँकेस ८५८ कोटींचा संचित तोटा

३१ मार्च २०२५ अखेर नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला तब्बल रु. ८५८.११ कोटींचा संचित तोटा आहे. या गंभीर परिस्थितीत नाशिक जिल्हा बँकेच्या सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजना करणे आणि बँकिंग व्यवहारात सर्व प्रकारचे मार्गदर्शन करण्याची मोठी जबाबदारी राज्य सहकारी बँकेने स्वीकारली आहे.


### महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातील अभिनव प्रयोग

महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातील हा एक अभिनव प्रयोग मानला जात आहे. या अंतर्गत राज्य सहकारी बँकेकडे उपलब्ध असलेली साधनसामुग्री आणि मनुष्यबळ यांचा उपयोग करून, पुढील दोन वर्षांत नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला सक्षम करण्याचा राज्य सहकारी बँकेचा प्रयत्न राहील. या निर्णयामुळे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### 'देशदूत'च्या कार्यक्रमात सूतोवाच

गेल्या महिन्यात झालेल्या 'देशदूत' आदर्श पतसंस्था पुरस्कार २०२५' या समारंभास मुख्य अतिथी म्हणून राज्य राज्य सहकारी बँकेचे प्रशासक, ज्येष्ठ सहकार व बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर उपस्थित होते. या कार्यक्रमात जिल्हा बँकेवर संस्थात्मक सल्लागार म्हणून आपली निवड होणार असून, दीड वर्षात जिल्हा बँकेचे पुनरुज्जीवन होणार असल्याचे सूतोवाच केले होते.

## शब्दकोडे : ८३३



**आडवे शब्द** : १) लग्न सोहळा. ६) आशीर्वादाचे शब्द. ८) हत्ती. ९) कारखान्यातील मजूर. १०) सहाचा फटका. १३) अंग मोडून येणे. १४) कमळाचे तळे, विष्णू देवाचे एक नाव १७) मलई. १९) वार्ता, समाचार. २०) मोठी वाटी. २१) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा. २५) वसन, वस्त्र. २७) रात्री झोप न घेता फिरणारा. ३०) दुर्लक्षिण्याजोगा. ३२) दोन महान ग्रंथ. ३५) चामखीळ. ३७) तात्पर्य, सारांश. ३८) मूल. ४१) ताकद. ४२) तडफड, घालमेल. ४३) टरफल, ४४) तात्काळ लगेच समर्पक उत्तर देणारा. ४६) अवकाश, वेळ, मर्यादा. ४७) राख. ४९) रहस्य (हिंदी) ५०) डावा. ५१) गाडीचे छत. ५३) सैन्यदल. ५४) पचविणारा. ५६) यथाशास्त्र. ५८) वस्तू तयार करण्यासाठी लागणारी उपकरणे. ५९) रडणारा. ६१) बगळा. ६२) पुत्र, मुलगा. ६४) कान. ६६) चिवचिवाट. ६८) पाथरवट. ७०) फुरसत. ७१) स्वतःला. ७२) पोलीस, कोतवाल.

**उभे शब्द** : १) खास. २) वजनाला अत्यंत कमी. ३) विणकऱ्यांच्या उपजिविकेचे साधन. ४) करमणूक करणारे. ५) गलोलीने उडवावयाच ाबारीक खडा. ६) वरपांगी. ७) वाचणारा. ९) कावळा. ११) भोगावे लागणारे परिस्थितीतील आघात, ठेचा, प्रहार इ. १२) पृथ्वी. १५) अत्यंत आवडता, प्रिय. १६) पुष्कळ, खूप. १८) व्रत, वैकल्य इ. कृत्ये. २२) कैफ, धुंदी. २३) केर. २४) नवर देवास लग्नात वधूने घालण्याची माळ.२६) वेतन. २८) युद्धात धीटपणे उभा राहणारा योद्धा. २९) मोठा समुद्र, महार्णव. ३०) साधकबाधक चर्चा, विचार विनिमय. ३१) क्षमा करण्याजोगे. ३३) वजन. ३४) ताजे दिसणारे, प्रफुल्लित. ३६) एखाद्या कृत्यासाठी सांगीतलेली अनेक कारणे. ३९) रात्री जागे राहून हिंडणारा-फिरणारा. ४०) शोभिवंत, शोभणारा. ४२) तुझे. ४५) भाकरीचे धान्य. ४६) मृत्यू नसलेला. ४८) धुणे. ५०) दुर्गंधी येऊ लागलेला. ५२) ज्ञानेश्वरांनी लिहलेली प्रार्थना. ५५) फांदी तुटतानाचा आवाज. ५७) जोडीतील एक चर्मवाद्य. ६०) आजच्या आधीचा दिवस. ६२) घोड्याचे घर. ६३) निषध देशाचा राजा. ६४) पिकांवर पडणारा एक रोग. ६५) सेवक. ६७) काठ, बाजू. ६९) मस्ती, जोम

### शब्दकोड२६५चे उत्तर

